भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# -: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :-

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक ३१.०७.२०१९ ते ०४.०८.२०१९)

| अंक ६१/२०१९ | दिनांक ३०.०७.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (२४/०७/२०१९ ते ३०/०७/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता ३१/०७/२०१९ ते ०४/०८/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४/०७ | २५/०७ | २६/०७ | २७/०७ | २८/०७ | २९/०७ | ३०/०७ | दिनांक | | ३१/०७ | ०१/०८ | ०२/०८ | ०३/०८ | ०४/०८ |
| ११६.९ | ६९.८ | ४०.२ | २६.४ | २६.५ | ५९.७ | ७०.२ | पाऊस (मि. मी) | | ४० | ५६ | ६० | ६१ | ५१ |
| ३०.० | २८.० | २८.० | २८.० | २९.० | २८.० | २८.० | कमाल तापमान (अं. से) | | २९ | २९ | २९ | ३० | २९ |
| २३.० | २३.० | २३.५ | २३.० | २४.० | २३.० | २३.० | किमान तापमान (अं. से) | | २४ | २४ | २४ | २५ | २५ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | ८ | ८ | ७ | ६ | ७ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार | | | | | | |
| ९६ | ९५ | ९३ | ९३ | ९३ | ९६ | ९५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ९२ | ९२ | ९१ | ९१ | ९२ |
| ९२ | ९२ | ९३ | ९२ | ८५ | ९२ | ८५ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ८७ | ८५ | ८३ | ८३ | ८४ |
| १.६ | ०.३ | ०.३ | ०.३ | १.० | ०.५ | १.५ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | ०१५ | ०१६ | ०१६ | ०१९ | ०२४ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | पश्चिमे | सकाळ | वा-याची दिशा | पश्चिमे कडून | पश्चिमे कडून | पश्चिमे कडून | पश्चिमे कडून | पश्चिमे कडून |
| पश्चिमे | दक्षिणे | स्थिर | स्थिर | दक्षिणे | स्थिर | स्थिर | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | २२१७.४ | २२१७.४ | ४०९.७ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्हयात वा-याचा वेग वाढुन मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | रोप | ज्या ठिकाणी भाताची लावणी पुर्ण होऊन जास्त दिवस झालेले आहेत अशा ठिकाणी पाण्याची पातळी योग्य राहील याची दक्षता घ्यावी. काही ठिकाणी भाताच्या पुर्नलागवडीनंतर एक महिना झालेले पीक कमाल फुटवे येण्याच्या अवस्थेत असल्याने नत्र खताचा दुसरा हप्ता प्रति गुंठा ८७० ग्रम युरियाच्या स्वरुपात द्यावा. तत्पुर्वी भात खाचरातील तणांची बेणणी करावी व शेतातील पाणी काढुन टाकावे. खत दिल्यानंतर पाणी बांधुन घ्यावे. तसेच भात पीकाचे किड, रोग इ. साठी सतत निरक्षण करावे. शेताच्या बांधावरील वाढलेल्या तणांच्या नियंत्रणासाठी पावसाची उघडीप पाहून ग्रामोक्झोन हे तणनाशक ३ मिलि प्रती लिटर पाण्यात मिसळुन बांधावर फवारावे. भातावर करपा रोगाचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास आवश्यकतेनुसार ट्रायसायक्लेंझोल १० ग्रम किंवा आयसोप्रोथिऑलेन १० मिलि प्रती १० लि. पाण्यातुन फवारावे. पाणी निचरणा-या शेतात तणांचा उपद्रव कमी करण्यासाठी ब्युटॅक्लोर तणनाशकाचा प्रती गुंठा ३० मिलि ५० ई.सी. ब्युटॅक्लोर ६लिटर पाणी याप्रमाणात लागवडीनंतर ४ दिवसांनी मागे सरत फवारावे. तणनाशक वापरानंतर शेतातील पाणी बांधुन ठेवावे. पाऊसाची उघडीप पाहूनच तणनाशक फवारावे. भात खाचरात मोठ्या प्रमाणात पाणी साचुन राहिल्यास अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा. |
| नागली | रोप | नागलीच्या रोपवाटीकेतील रोपे १५ दिवसांची झाली असल्यास रोपवाटीकेमधील तणांची बेणणी करुन युरीया या नत्रयुक्त खताचा गुंठ्यास १ किलो या प्रमाणे वापर करावा. तसेच लागवड करावयाच्या ठिकाणी ऊतारास आडवी पुर्व मशागत करावी. नागली ठोंबाच्या छिद्रात ८७० ग्रम युरीया व २.५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट प्रती गुंठा क्षेत्र याप्रमाणे खताची मात्रा द्यावी. |
| भुईमुग | पेरणी | भुईमुगातील तणांचा उपद्रव कमी करण्यासाठी ब्युटॅक्लोर अथवा ऑक्सीडायझॉल या तणनाशकाची प्रती हेक्टरी १.५ किंवा ०.५ किलोग्रम क्रियाशील घटकाची ५०० ते ६०० लिटर पाण्यातुन फवारणी करावी. पाऊसाची उघडीप पाहूनच तणनाशक फवारावे. पेरणीनंतर २० दिवसांनी बेणणी करावी. भुईमुग पिकात मोठ्या प्रमाणात पाणी साचुन राहिल्यास अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा. |
| आंबा | - | आंबा पिकात खताची मात्रा देउन झालेली असल्यास नियमित फळधारणेसाठी कलमांना १५ जुलै ते ३१ ऑगस्ट या दरम्यान १० वर्षावरील कलमांना पॅक्लोब्युट्राझॉल द्यावे. पॅक्लोब्युट्राझॉल हे झाडाच्या आकारमानानुसार व पसारा मोजुन द्यावयाचे असल्याने झाडाचा पुर्व-पश्चिम व दक्षिण-उत्तर पसा-याचा व्याज मोजावा. उदा- पुर्व- पश्चिम व्यास ५ मिटर व दक्षिण-उत्तर व्यास ३ मिटर म्हणजे सरासरी व्यास ४ मिटर होईल. २३% पॅक्लोब्युट्राझॉल घटक असलेल्या रसायनातुन द्यावयाचे असल्याने प्रती मिटर व्यासास ३ मिलि प्रमाणे १२ मिलि कल्टार द्यावे. प्रत्येक झाडाला पॅक्लोब्युट्राझॉलची मात्रा घेउन ३ ते ६ लिटर पाण्यात मिश्रण तयार करावे व खताच्या रिंगेच्या आतल्या बाजुस १५ सेमी खोलीचे २५ ते ३० खड्डे खणावे प्रत्येक खड्ड्यात १०० मिली याप्रमाणात पॅक्लोब्युट्राझॉल ओतावे आणि खड्डे बुजवुन घ्यावेत. पॅक्लोब्युट्राझॉल देण्यापुर्वी व नंतर झाडाभोवती असलेले गवत काढुन घ्यावे. तसेच जमिनीत पुरेसा ओलावा असेल याची खात्री करावी व पाऊसाची उघडीप बघुन पॅक्लोब्युट्राझॉल द्यावे. काही ठिकाणी पाऊसाने ऊघडीप दिल्यास व आंब्यामध्ये नवीन पालवी आली असल्यास त्या पालवीचे तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, पाने खाणारी अळी आणि मिजमाशीपासुन आवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी २५% प्रवाही डायमिथोएट १२ मिली किंवा ३६% प्रवाही मोनोक्रोटोफॉस ११ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन पावसाची ऊघडीप पाहुन फवारणी करावी. फवारणीच्यावेळी किटकनाशक/बुरशीनाशक द्रावणामध्ये स्टीकर सारखा चिकट पदार्थ १ मिलि/१लि. पाणी याप्रमाणात मिसळावा. |
| काजु | - | काजुवर खोडकिडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी.लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. काजुमध्ये काढणीनंतर जुन्या व रोगट फांद्या कापून त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे. |
| काजु, नारळ, सुपारी व चिकु | | नारळावरील पानांवरील ठिपके, सुपारीवरील फळगळ या रोगांच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. डॉ. बा.सा.कोकण कृषी विद्यापीठाने शिफारस केल्याप्रमाणे काजु, नारळ, सुपारी व चिकु फळपिकांना खताची मात्रा द्यावी. पाच वर्षाच्या व त्यापुढिल नारळाच्या माडांना ५ घमेली चांगले कुजलेले शेणखत व ३ कि. सिंगल सुपर फॉस्फेट तसेच नत्र व पालाशचा पहिला हप्ता म्हणजेच ७५० ग्रम युरीया व ६६० ग्रम म्युरेट ऑफ पोटॅश या प्रमाणात खते द्यावीत. खते द्यावयाची वेळी जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असल्याची खात्री करावी. या आठवड्यात वा-याचा वेग वाढलेला असल्याने नविन लागवड केलेल्या कलमांना/रोपांना काठीचा आधार द्यावा. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
सहयोगी अधिष्ठाता
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

डॉ. बळवंत ना. सावंत
सहयोगी संशोधन संचालक/नोडल ऑफिसर
(ग्रामिण कृषि मौसम सेवा)
प्रा.फ.सं.के. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग
(०२३६६-२६२२३४, २६२६९३)

डॉ. यशवंत चं. मठाळ
तांत्रिक अधिकारी
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)